Cosmos Multidisciplinary Research E-Journal Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal Impact Factor 4.94 ISSN No. 2456-1665

# आदिवासी समाजातील व्यसनाधिनतेची समस्या

**प्रा. डॉ. ए. आर. वागडव**
समाजशास्त्र विभाग प्रमुख
विवेकानंद कला, स. द. वाणिज्य व
विज्ञान महाविद्यालय, औरंगाबाद.

**प्रस्तावना:**

व्यसनाधिनता ही प्राचीन काळापासून अस्तित्वात असली तरी अलीकडच्या काळात या समस्येने गंभीर स्वरूप धारण केलेले आहे. जगातील बहुतांश लोकांना अंमली पदार्थ सेवन करण्याचे व्यसन लागलेले आहे. त्यामुळे अंमली पदार्थांचे सेवन ही जगभरात आढळणारी सर्वात मोठी सामाजिक समस्या आहे. आज वेगाने बदलणारी सामाजिक व्यवस्था, औषधोपचारांमध्ये मादक पदार्थांचा वाढता वापर आणि या पदार्थांना मिळाणारी समाजाची स्वीकार्यता, सहज उपलब्धता यामुळे समाजातील अनेक लोक अंमली पदार्थांच्या व्यसनाला बळी पडलेले दिसतात. भारतात पान मसाला, गुटखा, विडी, सीगारेट, हुक्का अशा विविध स्वरूपात तंबाखूजन्य पदार्थ सहज उपलब्ध आहेत. त्यांच्या सेवनातून अनेक आजारांना लोक बळी पडताना दिसतात.

मादक पदार्थाच्या सेवनाने, त्यातील घटकद्रव्ये शरीरात मिसळतात. रक्तवाहिन्यांचे जाळे शरीरभर असल्याने मादक पदार्थाच्या संवेदना शरीरभर पसरतात. ही नशा उतरल्यावर मग पुन्हा त्या पदार्थाच्या सेवनाची इच्छा जडते या प्रकारची वारंवारिता म्हणजेच व्यसनाधिनता होय. भारतात आदिवासींमध्ये मोठ्या प्रमाणात व्यसनाधिनतेचे प्रमाण आढळून येते. २०११ च्या जनगणनेनुसार भारतातील आदिवासींची लोकसंख्या १०.४२ कोटी इतकी असून एकूण लोकसंख्येशी त्यांचे प्रमाण हे ८.६ टक्के आहे. एकूण ७०५ विविध आदिवासी जमाती भारतात आढळतात.[१] आदिवासी समाज जंगलात वास्तव्य करून राहत असल्याने श्रमपरिहारासाठी, मनोरंजनासाठी इतर कोणतीही साधने उपलब्ध नसल्याने या समाजाने तंबाखू, मद्यपान अशा अनेक व्यसनांना जवळ केले आहे. अर्थात या व्यसनांच्या दुष्परिणामाबद्दल ते अनभिज्ञ आहेत. इंडियन कौन्सिल ऑफ मेडिकल रिसर्चने म्हटले आहे की, तंबाखूजन्य रोग गटात कर्करोग, हृदयरोग आणि फुफ्फुसातील जुनाट आजार यांचा समावेश होतो. तंबाखूमुळे दरवर्षी ८ दशलक्षहून अधिक लोकांचा बळी जातो. यापैकी ७ दशलक्ष लोकांचा मृत्यू थेट तंबाखूच्या वापरामुळे तर १.२ दशलक्ष लोकांचा धुम्रपान करणाऱ्या लोकांच्या संपर्कात आल्यामुळे मृत्यू झाला असे जागतिक आरोग्य संघटनेची आकडेवारी सांगते.[२]

तंबाखू, दारूच्या व्यसनाचे गंभीर दुष्परिणाम शरीरावर होत असूनही भारतातच नव्हे तर जगभरातील असंख्य लोक याचे व्यसन करताना दिसून येतात. भारतातील बहुतांश

आदिवासी देखील आज अनेक व्यसनांच्या आहारी गेलेले असून त्याचे वैयक्तिक आरोग्यावर तसेच सामाजिक परिणाम मोठ्या प्रमाणात दिसून येतात. आदिवासींमधील व्यसनाधिनतेचा आढावा घेण्याचा प्रयत्न संशोधकाने सदर संशोधनातून केलेले आहे.

**आदिवासींमधील व्यसनाधिनतेचे स्वरूप—**

आदिवासी समाजात दारू पिणे, तंबाखू खाणे आणि बिडी ओढणे, अफू, गांजा आणि भांग सेवन करणे तसेच जुगार, सट्टा लावणे अशी व्यसने असल्याचे दिसून येतात. ही व्यसने लागण्यामागे जे महत्वाचे कारण दडलय ते म्हणजे आदिवासी कुटुंबाची गरीबी हे होय. दुर्गम भागातील आदिवासींना वेळेवर काम मिळत नाही. त्यामुळे त्यांना खाण्यासही वेळेवर मिळत नाही. दारिद्र्य हे दारू पिण्याचे महत्वाचे कारण आहे कारण घरात काही खायला नसले की दारू पिऊन किंवा इतर व्यसनाने भूक मारली जाते. नवरा—बायको स्वत: दारू पितातच पण मुलांनाही दारू पाजतात. दारू ही एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे जाऊन त्यांच्या जीवनाचा ती एक अविभाज्य भाग बनली आहे. व्यसनाधिनतेमुळे आदिवासी अगदीच अगतिक झाले असून त्यामुळेच ते दारिद्र्याच्या दुष्टचक्रात अडकून पडले आहेत.

हिमांशू चतुर्वेदी (२०१६)[३] यांनी ईशान्य भारतातील आदिवासी लोकांमधील मादक पदार्थांच्या सेवनाबाबत एक सर्वेक्षण केले. त्या अभ्यासात त्यांना असे निदर्शनास आले की, ६७ टक्के आदिवासी पुरूष व ३८ टक्के आदिवासी महिला ह्या मादक पदार्थ जसे तंबाखू, दारू, अफू याचे सेवन करीत होते. अरूणाचल प्रदेश राज्यात आदिवासींमध्ये तंबाखू आणि मद्यपान करणाऱ्या आदिवासींचे प्रमाण अधिक असल्याचे आढळून आले. तथापि, भारतात अंमली पदार्थांचे सेवन करणाऱ्या सर्वसामान्य लोकांमध्ये पुरूषांमध्ये तंबाखू सेवण करणारे ५७ टक्के आणि मद्यपान करणारे ३२ टक्के तर महिलांमध्ये तंबाखू सेवण करणाऱ्या ११ टक्के तर मद्यपान करणाऱ्या महिलांचे प्रमाण केवळ २ टक्के इतके होते. तंबाखू आणि मद्यपान अशा दोन्ही प्रकारचे व्यसन करणाऱ्यांचे प्रमाण आदिवासी समाजात अधिक असल्याचे या अभ्यासावरून दिसून येते.

आदिवासींमध्ये तंबाखू सेवण आणि मद्यपान या दोन्ही बाबी सामान्य आहेत मात्र त्यांच्यात अगदी लहान वयातच तंबाखू सेवन (१७ वर्षे) आणि मद्यपान (१४ वर्षे) सुरू केले जाते. आदिवासी जमातींमध्ये केल्या जाणाऱ्या व्यसनांमध्ये मद्यपानाचे प्रमाण अधिक आहे. हे प्रमाण अधिक असण्याला मद्यपानाला आदिवासींची सामाजिक स्वीकार्यता आणि त्यांची पारंपरा व श्रध्दा जबाबदार आहेत. दारू ही प्रामुख्याने आदिवासी कुटुंबातच तयार केली जाते आणि घरी आलेल्या पाहुण्यांना देखील आदरतिथ्य म्हणून 'पवित्र पेय' समजून दिले जाते. तर तंबाखू हा सहज उपलब्ध होणारा पदार्थ असून तो सामान्यत: मित्रांसह इतरांमध्येही प्रामुख्याने सामाईक केला जातो. तसेच तंबाखू धूम्रपान किंवा उत्तेजक पदार्थ म्हणून सेवन केला जातो. आदिवासींमध्ये तंबाखू आणि मद्यपान जरी लहान वयातच सुरू झालेले असले तरी तरूण वयात मात्र याच्या सेवनाचे प्रमाण तुलनात्मकदृष्ट्या कमी होत जाते. शिक्षणाचे

प्रमाण जसजसे वाढत जाते तसतसे मादक पदार्थांचे सेवण कमी होत गेल्याचे या अभ्यासावरून निदर्शनास आलेले आहे. नोकरी करणारेही मद्यपान आणि तंबाखू व्यसनाच्या आहारी गेलेले होते. नोकरी, व्यवसाय असणाऱ्या लोकांमध्ये अंमली पदार्थ खरेदी करण्याची क्षमता असल्याने त्यांच्यात या पदार्थांचे सेवन करणाऱ्यांचे प्रमाण अधिक आहे.

आदिवासींमध्ये अगदी बालवयापासूनच विविध व्यसनांची सवय लागलेली असते. आदिवासी आश्रमशाळेतील मुलांमधील व्यसनाधिनतेच्या एका सर्वेक्षणाअंती असे आढळले की, ४१.७४ टक्के विद्यार्थी तंबाखूचे सेवन करतात तर ४.०७ टक्के विद्यार्थी मद्यपान करीत असल्याचे निदर्शनास आले.[४] आश्रमशाळेतील बहुतांश विद्यार्थी व्यसनांच्या दुष्परिणांपासून अनभिज्ञ होते. कुटुंबातील इतर सदस्य व्यसनी असल्याने तसेच सहकारी मित्र व्यसन करीत असल्यामुळे अगदी शालेय वयापासूनच आदिवासी मुलांमध्ये व्यसनाधिनतेचे प्रमाण अधिक दिसून येते. या व्यसनांमुळे व्यक्तीच्या शारिरीक आणि मानसिक कार्यक्षमतेवर विपरित परिणाम होतात शिवाय आयुमर्यादादेखील कमी होत जाते. मात्र निरक्षतेमुळे व्यसनांच्या दुष्परिणामांची माहिती नसल्यामुळे आदिवासी लोकांकडून सऱ्हासपणे व्यसने केली जातात.

**आदिवासींमधील मद्यपान—**

मद्यपानाचे व्यसन ही अशी स्थिती आहे की ज्यात व्यक्ती किती मद्य घ्यावे यावरील नियंत्रण गमावतो आणि सतत मद्य प्राशन करतो. मद्य आणि आदिवासी हे समिकरण फार जवळचे आहे. अगदी प्राचीन काळापासून आदिवासी मद्यसेवन करीत आलेला आहे. दिवसभर काम करून आल्यावर श्रमपरिहार व्हावा म्हणून स्वत:च काढलेली माडाची, खजरीची ताडी (एका झाडाच्या रसापासून तयार केलेली देशी दारू) तो मोठ्या प्रमाणात पितात. आदिवासी समाजामध्ये पुरूषांबरोबर महिलाही ताडी पितात. त्यात काहीही गैर समजले जात नाही. पूर्वीची ताडी ही फार मादक नसायची, उलट तिच्यात पोषणाचा काही अंश असल्यामुळे आदिवासींच्या दृष्टीने फायद्याचे होते. पण आता काळा गूळ आणि नवसागर यांच्या मिश्रणातून अनेक पाडे, वाड्या—वस्त्यांवरून घरगुती भट्ट्या सर्रासपणे चालवल्या जातात. आज जसजसे आदिवासी लोक शहरांच्या संपर्कात आले तस तशी या भागात देशी दारूही विकली जाऊ लागली आहे. दारू पिण्याचे प्रमाण जसजसे वाढत जाते तसे त्याचे रूपांतर व्यसनात होते.

आज आदिवासी समाजातील बहुतांश लोक मद्यसेवन करतात. त्यांचा कोणताही सण, उत्सव दारूशिवाय साजरा होत नाही. ठाणे, नाशिक आणि पश्चिम खान्देशातील आदिवासी समाजाच्या समस्यांची पाहणी करण्यासाठी १९३८ मध्ये तत्कालीन ब्रिटीश शासनाने जॉन सिमिंग्टन या वरिष्ठ अधिकाऱ्याची नियुक्ती केली होती. आपल्या पाहणीनंतर आपल्या अहवालात तो लिहितो की, 'दे ड्रिंक ॲज ए रेस!'[५] दारूने त्यांचे पूर्ण आयुष्य व्यापले आहे. त्यांची लग्ने दारूशिवाय होत नाहीत, जातपंचायत दारूशिवाय बसत नाही, मर्तिक दारूशिवाय पार पडत नाही. थोडक्यात मूल जन्माला आले की प्रथम त्याच्या तोंडात

दारूचे थेंब घालतात आणि माणूस मेला म्हणजे त्याच्याही तोंडात दारू सोडतात. आदिवासी पाड्यांमध्ये वडिलोपार्जित गावठी दारू गाळण्याचे प्रकार चालतात त्यामुळे एका पिढीकडून दुसऱ्या पिढील हे दारू गाळण्याचे ज्ञान बरोबर हस्तांतरित केले जात असते. पहिल्या धारेची दारू कोणती? कडक दारू कोणती याबाबत अगदी लहान आदिवासी बालकांनाही ज्ञान असते.

आदिवासींचे लग्न समारंभ म्हणजे दारूची मोठी रेलचेल असते. हे लग्न जमविण्यापासून ते पार पडेपर्यंत वऱ्हाडी मंडळींना व नातेवाईकांना दारू देण्याची प्रथा आदिवासी समाजात आहे. नवऱ्या मुलीचा बाप कितीही गरीब असला त्याची ऐपत नसली तरी त्याने कर्ज काढून का होईना पण लग्नात दारू सर्वांना दिली पाहिजे, असे बैठकीतच ठरवले जाते आणि तिथूनच पुढे लग्नाचा कार्यक्रम ठरवला जातो. जो वर किंवा वधूचा बाप जास्तीत जास्त दारू लोकांना प्यायला उपलब्ध करून देईल तो सर्वात श्रीमंत समजला जातो. लग्नानंतर जावई जेव्हा सासरी येईल तेव्हा त्याचे स्वागत दारूनेच होते. इतकी ही दारू आदिवासी लोकांच्या अंगवळणी पडलेली आहे.

अमिटी विद्यापीठ, मुंबईतील समाजकार्याच्या विद्यार्थ्यांनी आदिवासींमधील दारूच्या व्यसनाबाबत सर्वेक्षण केले असून त्यांना आदिवासी पाड्यांवर दारूचे व्यसन मोठ्या प्रमाणात दिसून आले. आदिवासी कुटुंबातील ७५ सदस्यांमध्ये दारूचे व्यसन असल्याचे आढळून येते. ५० टक्के आदिवासी पाड्यांवर दारू सहज उपलब्ध असल्यामुळे आदिवासींमध्ये दारूच्या व्यसनाचे प्रमाण अधिक असल्याचे आढळले. दारूचे व्यसन करणारे ९७ टक्के लोक दारिद्र्यरेषेखालील असून ७५ टक्क्यांहून अधिक मंडळी दररोज २० रूपयांपेक्षा अधिक खर्च दारूच्या व्यसनावर खर्च करतात. ६५ टक्के लोकांना दारूच्या दुष्परिणामांची माहिती नव्हती तर ८० टक्के व्यसनाधिन आदिवासी लोकांनी या व्यसनापासून मुक्तता हवी असल्याचे सांगितले असल्याचे या अभ्यासाचे निष्कर्ष आहेत.[६] निरक्षरता असल्याने दारूच्या दुष्परिणामांची जाणीव त्यांना नसते परिणामी बालवयापासूनच आदिवासी लोक दारूच्या आहारी गेलेले असतात.

दारू हा आदिवासींच्या कौटुंबिक खर्चाचा एक भाग बनला असून त्या व्यसनाने आदिवासींचा शारीरिक ऱ्हास झाला आहे यात शंका नाही. महाराष्ट्र आणि तामिळनाडूमध्ये कायद्याने आदिवासी भागांतही संपूर्ण दारूबंदी आहे. तथापि काही आदिवासींमध्ये देशी दारूला धार्मिक विधीत महत्वाचे स्थान असल्याने आणि महत्वाच्या प्रसंगी आलेल्या पाहुण्याला दारू पाजणे हा आदरतिथ्याचा भाग असल्याने दारू पिणे अगर बेकायदेशीर दारू गाळणे यांना बंदी घालणे कठीण आहे.[७] परंतु भारतातील दारूबंदीचे काही सकारात्मक परिणाम देखील दिसून आलेले आहेत. अमेरिकन इकॉनॉमिक रिव्हू या प्रतिष्ठित जर्नलमध्ये हारवर्ड पेन्सिल्वेनिया विद्यापीठ व जागतिक बॅंकेच्या तज्ञांनी भारतातील विविध राज्यातील दारूबंदीचा अभ्यास प्रकाशित केला. या अभ्यासातून असे दिसते की, दारूबंदीमुळे

भारतातील ४० टक्के मद्यसेवन कमी झालेले आहे व स्त्रियांवरील अत्याचार ५० टक्के कमी झालेले आहेत.[८] त्यामुळे दारूबंदी धोरण सक्तीने राबविल्यास या व्यसनाचे दुष्परिणाम काही अंशी कमी करता येतील असे म्हणता येईल.

**व्यसनाधिनतेचे दुष्परिणाम—**

दारू आणि इतर मादक पदार्थांचे सेवन करणे हे कोणत्याही व्यक्ती आणि समाजाच्या प्रगतीतील सर्वात मोठा अडथळा आहे. दारूच्या प्रतिबंधाशिवाय देशाची समाजार्थिक प्रगती शक्य नाही. दारूमुळे राष्ट्राच्या संपत्तीचा अपव्यय होतो, आरोग्याचा स्तर खालावतो. 'ग्लोबल बर्डन ऑफ डिसिजेज'[९] हा जगातील सर्वात मोठा पब्लिक हेल्थ सर्व्हे असे सांगतो की, मृत्यू व रोग निर्माण करणाऱ्या सर्वात ७ प्रमुख कारणांमध्ये दारू आणि तंबाखूचा समावेश होतो. जगभरात दरवर्षी दारूमुळे ३३ लाख लोक मृत्यूमुखी पडतात. दारूमुळेच व्यक्तीची कार्यक्षमता ढासळते, दारिद्र्यात वाढ होते, वैयक्तिक आणि कौटुंबिक विघटन होते आणि गुन्ह्यांत वाढ होते.

जगभरात दरवर्षी ३ दशलक्ष मृत्यू हानीकारक दारूच्या वापरामुळे होतात हे प्रमाण एकूण मृत्यूच्या ५.३ टक्के इतके आहे. २०० पेक्षा अधिक आजार आणि गंभीर दुखापत होण्यास हानिकारक दारूचे सेवन जबाबदार असल्याचे होते. आरोग्यावरील दुष्परिणामांव्यतिरिक्त दारूच्या अतिप्रमाणात वापराचे मोठ्या प्रमाणात सामाजिक आणि आर्थिक नुकसान होते असे WHO ने म्हटले आहे.[१०]

'लॅन्सेट' हे वैद्यकीय क्षेत्रातील सर्वाधिक प्रतिष्ठित जर्नल असे सांगते की, भारतातील २० टक्केपेक्षाही जास्त रूग्णभरती व दवाखान्यात भरती होणाऱ्या ६० टक्के आपत्कालीन दुर्घटना दारूमुळे होतात. 'लॅन्सेट'मधील अहवाल असेही सांगतो की, दारूचे दुष्परिणाम हे गरीब व उपेक्षित घटकांवर अधिक होतात.[११] अर्थात दारू ही आर्थिक विषमता वाढविण्याचे काम करते. दारूचे वाईट परिणाम हे पिणाऱ्यापुरते मर्यादित न राहता स्त्रियांवर अत्याचार करणे, गरीबी वाढणे, वाहतूक दुर्घटना व उत्पादकतेचे नुकसान अशा व्यापक स्वरूपात समाजावर देखील होतात.

दारूला मिळालेल्या समाजमान्यतेमुळे लैंगिक अत्याचार, घरगुती हिंसाचार, वैवाहिक बलात्कार, अपघात हे बऱ्याचदा दारूच्या प्रभावाखाली होतात ही गोष्ट सोईस्करपणे दुर्लक्षित केली जाते. जगभरातील आकडेवारी असे सांगते की बहुतांश हिंसक गुन्ह्यांमध्ये दारूच प्रभावी असते असे आढळले आहे. दारू हे शीतपेय किंवा रोगप्रतिकार शक्तीवर्धक औषध नसून आरोग्याला घातक पदार्थ आहे. दारू आरोग्यासाठी हानिकारक असून सेवनासाठी सुरक्षित प्रमाण 'शून्य' आहे, मद्य सेवनाचा आरोग्याला फायदा होत असल्याचा कोणताही ठाम पुरावा संशोधकांना सापडलेला नाही. त्यामुळे आरोग्यास अपायकारक असलेली दारू आणि इतर मादक पदार्थांवर तात्काळ कठोर बंधने घातली पाहिजेत. व्यसनाधिनतेमुळेच

आदिवासी समाजाची वाताहत झालेली असून व्यसनाधिनता हे आदिवासींच्या मागसलेपणाचे प्रमुख कारण आहे. त्यामुळे त्यांना व्यसनाधिनतेपासून परावृत्त करणे गरजेचे आहे.

**उपाययोजना—**

आजचा आदिवासी समाज पूर्णपणे व्यसनांच्या आहारी गेला असून त्यांना या व्यसनापासून परावृत्त करणे गरजेचे आहे. त्यासाठी आदिवासींमधील अनेक कार्यकर्ते पुढे आले पाहिजेत. त्यांनी मोठ्या हिरीरीने कामाला सुरूवात केली पाहिजे.

दारू व इतर व्यसनांचे दुष्परिणाम व्यक्तीवर समाजावर कसे होतात हे या समाजाला सोप्या भाषेत समजावून सांगितले पाहिजे. व्यसनाधिनतेमुळे व्यक्तीचे आयुष्य कमी होते, त्याची कार्यक्षमता कमी होऊन त्याला काबाडकष्ट करणे अशक्य होते. या गोष्टी समाजाच्या गळी उतरवणे गरजेचे आहे.

आदिवासी समाजातील तरूणांनी आपल्या विचारशक्तीला चालना दिली पाहिजे. म्हणजेच धडधाकट, निरोगी, बुध्दिजीवी तरूण पिढी निर्माण होईल व या समाजाला व्यसनमुक्त होण्याचा खरा आनंद मिळेल.

प्रशासनाच्या सर्व विभागांनी एकत्र येऊन काम करणे, शालेय, महाविद्यालयीन तसेच आदिवासी पाड्यांवरील तरूण मंडळांच्या माध्यमातून दारूच्या दुष्परिणामांची सातत्याने जागृती करणे, आदिवासी तरूणांशी संवाद साधत त्यांना प्रशिक्षित करणे तर दारूमुक्तीसाठी रोजगाराच्या जास्तीत जास्त संधी उपलब्ध करून देणे गरजेचे आहे.

आदिवासींना स्वत:च्या वैयक्तिक व खास प्रकारच्या उपयोगाकरिता त्यांच्या विशिष्ट मद्यप्रकारास मुभा देण्यात यावी; परंतु त्यांच्या व्यापारी उपयोगाकरिता परवाणगी देण्यात येऊ नये. आदिवासी भागातील मद्यविक्रीला प्रतिबंध करावा.

समाजात दारूचे प्रमाण कमी करायचे असल्यास वाढीव सामाजिक कर लावणे आणि दारूच्या उत्पादन—विक्रीवर प्रतिबंध आणणे हे महत्त्वाचे टप्पे आहेत. फक्त जनजागृती आणि व्यसन उपचार करा, हा उपाय होऊ शकत नाही.

भारतात वेगवेगळ्या राज्यांत दारूच्या पुरवठ्यावर आणलेल्या प्रतिबंधामुळे घरगुती हिंसाचार कमी झाल्याचे हार्वर्ड विद्यापीठ आणि वर्ल्ड बॅंकेच्या संशोधकांच्या शास्त्रीय अभ्यासात आढळून आले.

दारूच्या दुष्परिणामांसाठी शासनालाही जबाबदार धरले पाहिजे. मद्रास उच्च न्यायालयाने 'दारूमुळे वाढणाऱ्या गुन्ह्यांत तामिळनाडू सरकारलाही जबाबदार धरावे', असं मत २०१९ मध्ये नोंदवलं होतं. ''दारूचे दुष्परिणाम माहित असून देखील जनतेला दारू विक्री करणे आणि सामाजिक शांततेचा भंग करणे हा CrPC च्या कलम १०७ अंतर्गत गुन्हा मानता येईल. राज्य सरकारने कधीतरी दारूच्या सामाजिक दुष्परिणामांची जबाबदारी स्वीकारावी.'' असा तर्क मद्रास उच्च न्यायालयाने दिला होता.

फक्त कायदे करून कोणताही सामाजिक प्रश्न सुटला नाही. त्यामुळे समाजातील कोणत्याही कुप्रथेची चौफेर नाकेबंदी केल्याशिवाय त्यातून सुटका नाही. दारू, तंबाखू आणि इतर मादक पदार्थाचे सेवन करणे हा खासगी निवडीचा नाही, नैतिकतेचाही नाही तर त्यापुढे जाऊन गंभीर सामाजिक प्रश्न आहे हे आदिवासी समाजाल पटवून द्यावे लागेल.

**संदर्भसूची—**

1. www.cencesindia.org
2. Tobacco, Key facts, World Health Organization, https://www.who.int/news-room/fact-sheets/detail/tobacco
3. Chaturvedi HK, Bajpai RC, Pandey A (2016) Predictors of Substance Use in the Tribal Population of Northeast India: Retrospective Analysis of a Cross-Sectional Survey. Journal of Addiction Researh and Therapy, 7: 295. doi:10.4172/2155-6105.1000295.
4. Gunjal Sandeep S and Others (2012). Tobacco and Alcohol Use in Tribal School students from Central India. *International Journal of Collaborative Research on Internal Medicine & Public Health*. Vol. 4 No. 11 (2012) PP.1852
5. देशपांडे, स. ह. (१९७८). *कोसबाड आणि आसपास*. दिवाळी विशेषांक, मौज प्रकाशन, पृ. ४१
6. https://maharashtratimes.com/maharashtra/thane-kokan-news/thane/adiwasi-addiction/articleshow/66208261.cms
7. गोखले, शरदचंद्र व कुलकर्णी, मा. ग. — अनुसूचित जाती व जमाती. मराठी विश्वकोश. महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई. https://vishwakosh.marathi.gov.in/26502/
8. बंग, अमृत (२०२०). भारतातील दारूबंदी प्रभावी आहे का?. दै. लोकमत (नाशिक), दि. १९ नोव्हेंबर २०२०, पृ. १०
9. Global Burden of Disease, https://www.thelancet.com/gbd
10. https://www.who.int/news-room/fact-sheets/detail/alcohol
11. बंग, अमृत (२०२०). भारतातील दारूबंदी प्रभावी आहे का?. दै. लोकमत (नाशिक), दि. १९ नोव्हेंबर २०२०, पृ. १०